International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 Nov – Dec 2022

# पारधी जमाती: पारंपारीक व्यवसायात झालेले परिवर्तन (नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागात स्थायी पारधी जमातीचे अध्ययन)

**डॉ. प्रल्हाद धोटे**
सहयोगी प्राध्यापक जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय उमरेड, जि-नागपूर
*Corresponding Author*- डॉ. प्रल्हाद धोटे
Email-pralhaddhote50@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7496113

**प्रस्तावना:-**

पारधी जमात ही आदिवासी समाजातील पूर्वाश्रमीची भटकी जमात आहे. गेल्या अनेक वर्षापासून गावगाडयाषी कोणत्याही प्रकारचा संबध न ठेवता पोटासाठी अजूनही रानावनात भटकणाऱ्या, फिरणाऱ्या जमातीपैकी पारधी जमात ही एक आहे. सेंट्रल प्रोव्हिजन्स आणि बेरार मधील १९९१ मध्ये त्यांची संख्या १५००० होती. पारधी जमाती मध्ये मातृसत्ताक पद्धती आढळून येते. भारतात १९७१ च्या जनगणनेनुसार पारधी जमातीची लोकसंख्या २७,३६३ होती. पारधी जमात ही फासेपारधी, बैलपारधी, चित्तापारधी, गायपारधी अषा अनेक नावाच्या प्रकाराणे ओळखतात. पारधी समाज हे राणाप्रतापचे वंषज आहे असे मानतात. त्यांचे कुलदैवत कालीमाता, भवानी, दुर्गा, सप्तक्षृंगी हे आहेत. त्यांचे गोत्र पवार, चव्हान, सांळूकी असून पवार, चव्हान, राजपूत, काळे अषी आडनावे आहेत.

नागपूर जिल्हयाच्या ग्रामिण भागात ५५० कुटुंबे स्थायी आढळून येते. त्यामध्ये शेषनगर, गड्डेपार व उदासा यांचे कुटुंबे येथे अधिक आढळतात. सद्यास्थितीत पारधी जमातीच्या पारंपारीक व्यवसायत बऱ्याच प्रमाणात परिवर्तन झालेले आहे. याचे मुख्य कारण वनकायदा हा आहे. त्यामुळे पारंपारीरक व्यवसायावर अनेक बंधने आले आहे. त्यामुळे आपल्या उपजिविकेसाठी पारंपारीक व्यवसायात बदल झालेले आढळून येतो.

**मुख्य शब्द**:- पारंपारीक षिकार करणे, व्यवसाय व परिवर्तन.

**उद्देष:-**

१) पारधी जमातीची आर्थिक स्त्रोत जाणून घेणे.

२) पारधी जमातीचा मुख्य पारंपारीक व्यवसाय अभ्यासने.

३) पारधी जमातीच्या पारंपारीक व्यवसायात झालेला बदल अभ्यासने.

**उपकल्पना:-**

१) पारधी जमातीचे आर्थिक स्त्रोतात बदल झालेला नाही.

२) पारधी जमातीचा मुख्य पारंपारीक व्यवसाय षिकार करून उपजीवीका भागवीणे हा आहे.

३) पारधी जमातीच्या पारंपारीक व्यवसायात बदल झालेला आहे.

**पारंपारीक व्यवसाय:-**

पारधी जमातीचा पारंपारीक मुख्य व्यवसाय पक्षयांची व प्राण्यांची षिकार करणे व आपली उपजिविका भागविणे हा आहे. ते जवळजवळ सर्व प्रकारचे मास खातात. घरातील स्त्रिया गावातच भिक मागून आणतात. मुलबाळांचा व कुटुंबियाच्या उदरनिर्वाहाचा प्रष्न सोडवितात. पारधी जमातीचे पोट भरण्याचे मुख्य साधन म्हणजे षिकार करणे होय. ही षिकार त्यांना पक्षी,प्राणी इत्यादी पासून मिळते. जंगल त्यांचा अन्नदाता आहे हे साहित्यावरून दिसून येते. जमीनीवर विस्तव पेटवून आणलेली षिकार भाजून त्यांचे तुकडे करून सहभागी लोकांना मासाचे तुकडे करून वाटण्या करतात. गावामध्ये पारधी षिकारीच्या मोबदल्यात प्रतिष्ठित नागारीकाकडून भाकरी व पोडया मिळवितात. काही पारध्याकडे शेती सुद्धा आहे.परंतु ती शेती मागास आहे. कारण शेती पिकविण्यासाठी भांडवल, आधुनिक शेती तंत्रज्ञान व रानावनात शेती असल्याने नापीक आहे. तसेच शेतीचे बहूसंख्य पारध्याकडे शेतीचे पट्टे नसल्याने शसकीय योजनांचा लाभ मिळत

नाही. तसेच पारंपारीक शेती पद्धतीमुळे उत्पादन कमी आहे.

**व्यवसायात झालेले परिवर्तन:-**

१८७१ साली गुन्हेगार जमाती कायदा करून पारध्यासह देषातल्या ४२ जमातींना 'गुन्हेगार' जमात ठरविले होते. भारत देष स्वातंत्र झाल्यावर १९५२ साली हा कायदा रद्द करण्यात आला तरी याचा परीणाम आजही या जमातींना भोगावा लागत आहे. 'गुन्हेगार' म्हणून एक 'कलंक' आजही या जमातीवर आहे. इतर समाज वाईट नजरेने या समाजाकडे पाहतात. मध्य प्रदेषातील इंदौर-झाबुआ या राष्ट्रिय महामार्गावर मछलिया घाट असून या घाटात भिल्ल आदिवासी जमाती राहतात. त्यांना 'गुन्हेगार' म्हणून इतर समाजाचा पाहण्याचा दुष्टिकोन बदललेला नाही. भिल्ल आदिवासी प्राण्याची व पक्षयांची षिकार 'तिरकमटा' या शस्त्राने करतात. तसेच स्वातंत्र भारताचा वनकायदया मुळे पारधी जमातीच्या पारंपारीक व्यवसायावर अनेक बंधने आली आहे. त्यातून त्यांचा उदरनिर्वाहाचा व पोटपाण्याचा गंभीर प्रष्न निर्माण झाला आहे. याचा परिणाम म्हणून पारधी जमात शेती व दारू व्यवसायाकडे वळल्याचे दिसून येते. यातून या जमातीच्या सामाजिक, आरोग्य विषयक, सांस्कृतीक तसेच मानसीक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. दारू व्यवसायामुळे अनेक कुटूंबे उद्‌वस्त झाली आहे. कायदयाने दारू व्यवसाय गुन्हा असल्याने अनेक कुटुंबातील कमवणाऱ्या व्यक्तिनां जेल, गुन्हा, फरारी अषा स्वरूपाचे गंभीर समस्येने सामोर जावे लागत आहे. यातून अनेक पारधी समाजाची कुटुंबे उद्धवस्त होण्याच्या मार्गाने आहे. यातून दारीद्र, उपासमारी, बेरोजगारी,वैफल्यग्रस्त, व्यसनाधीनता, कर्जबाजारी, आत्महत्या, दिर्घआजारी, मुलाबाळांचे कुपोषण अषा अनेक सामाजीक, आर्थिक व आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. विषेषत:ह पारधी समाज हा गावाला लागुन वेगळ्या वस्तीत समूहाने राहत असल्याने त्यांच्या समस्येकडे शासनाचे, सामाजिक संस्थाचे लक्ष अपूरे आहे.

**उपाय व षिफारषी**

पारधी समाजाच्या सामाजीक, आर्थिक विकासासाठी रोजगार श्रम कार्यक्रम हाती घ्यावे, तसेच श्रम कार्यक्रम संदर्भात **NGO** ची जागृती विषयक कार्य महत्तवाचे राहील. तसेच पारधी समाजाच्या व्यक्तींना आरोग्यावर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करून त्या समाजात जाणीव जागृती करणे महत्वाचे आहे. जेणेकरून त्यांच्यातील श्रद्धा-अधंश्रद्धा दूर होऊन त्यांचे सामूहिक आरोग्य चांगले राहिल. तसेच वनकायद्यामुळे पूर्णत: उपजिविकेचा आधार असलेल्या वनक्षेत्राला हा पारधी समाज मुकला आहे. त्यामुळे मोहफुल, जळावू लाकडी इंधन, वनउपज, जडीबुटी अषा अधिक स्त्रोता पासून हा समाज अलिप्त झाला आहे. त्यासाठी ज्या पारधी समाजाच्या कुटुंबाकडे इतर उत्पनाचे साधन नाही, तेव्हा त्यांना इतर व्यवसाय करण्यासाठी बँक व इतर पतसंस्थानी सहकार्य करणे महत्वाचे आहे. त्यासाठी शासनाने विषेष लक्ष द्यावे. शासकिय योजनांचा जास्तीत जास्त लाभ पारधी समाजाला मिळेल असे धोरण शासनाचे असावे. लहान मुलांमध्ये षिक्षणाची आवड निर्माण करावी. षिक्षीत युवकांना रोजगार, नोकरीविषयक शासनाच्या कार्यक्रमात सहभागी करावे. रोजगार हमी योजनांचा लाभ प्रत्येक कुटुंबाना मिळेल अषी शासकिय अमंलबजावणी करावी. जेणे करून हा पारधी समाज या दारिद्रियाच्या खाईतून बाहेर येईल व इतर सभ्य समाजाच्या सहवासाने व सहभागाने जिवन जगू शकतील.

**संदर्भ:-**

१) चौधरी पुण्या ना. आक्टो. २००६. पारधी: जिवन आणि भाषा.

२) बावणे लिन कुमारा २००९, भटक्यांचा भग्न संसार आणि संस्कृती, सुधीर प्रकाषन,वर्धा.

३) धोटे प्रल्हाद २०१८, पारधी जमातीचे सामाजीक व मानसीक परिवर्तन.